# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी
## ग्रंथालय विभाग

जा.क्र.भिनिशमनपा/ग्रंथालय/२४८/२०१८
दिनांक:-२७/२/२०१८

प्रति,

मा. उप-आयुक्त(मुख्या) सो,

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

**विषय:**- दिनांक २७ फेब्रुवारी मराठी भाष दिन साजरा करणे बाबत..

**संदर्भ:**- जा.क्र.भिनिशमनपा/मावज/२१४/२०१८ दिनांक १७/०२/२०१८

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये अहवाल सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाने जेष्ठ कवि वि.वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी १९१२ हा जन्मदिवस मंगळवार दि.२७/०२/०१८ हा दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करणे बाबत आदेश दिले होते, त्यान्वये आज मंगळवार दि.२७/०२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासन मान्य सार्व. वाचनालयाचे ग्रंथपाल तेजराव तायडे यांनी असंख्य वाचक व कर्मचा-यांच्या उपस्थितीत वि.वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचे फोटोस पुष्पहार अर्पण करुन त्यांना मानवंदना दिली. त्यावेळी सकाळच्या सत्रातील दिनेश चव्हाण, महेंद्र जाधव, लता घरत, आशालता गायकवाड, रुक्साना आसार उपस्थित होते. दु.४.०० वाजता श्री. नरहरी भोईर, लिपीक यांचे शुभहस्ते कुसुमाग्रजांचे फोटोस पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहीली. त्यावेळी तेजराव तायडे, ग्रंथपाल, दिनेश चव्हाण, लिपीक, सीबी चंद्रन, लिपीक, श्रीम लता घरत, लिपीक, आशालता गायकवाड, लिपीक, आझाद अन्सारी, हेल्पर तसेच रुक्साना आसारसह अनेक विद्यार्थी विद्यार्थीनी व वाचक हजर होते. हजर असलेल्या वाचनालयातील वाचक, विद्यार्थी, विद्यार्थीनी आणि कर्मचा-यांनी कवी सुरेश भट यांनी लिहीलेल्या व संगीतकार कौशल इनामदार यांनी संगीतबध्द केलेल्या **लाभले आम्हास भाग्य** या गीताचे समूह गायन केले. यावेळी सकस साहित्याची, नव्या माहितीची, आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञाना मधील मराठी भाषेतील पुस्तके वाचकापर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यात आले होते त्यामध्ये अनेक वाचकांचा सहभाग होता. सदर सोहळयाचे भ्रमणध्वनीव्दारे फोटो काढण्यात आले असून सोहळयाचा वृत्तांत व फोटो जनसंपर्क विभागाकडे प्रसिध्दी करीता उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

आपला विश्वासु

२७/२/१८

( टी.एल. तायडे)
ग्रंथपाल
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासन मान्य
सार्व. वाचनालय, मंडई. मनपा भिवंडी.

**प्रत:- माहितीस्त्व सादर**

१) मा. सहाय्यक आयुक्त(प्रशासन) भिनिशमनपा.

२)जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क विभाग भिनिशमनपा.

28/2/2018

(डॉ. सुनिल नागेश भालेराव)
सहायक आयुक्त (प्रशासन)